Pimpri Chinchwad Police Commissionerate

प्रेसनोट दि.२९/१२/२०२०

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, व चिंचवड पोलीस स्टेशन यांची सयुक्त टिम तयार करून महिलांचे गळयातील मंगळसूत्र हिसकावणा-या दोन सराईतांना अटक करून, १२,६०,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन २० गुन्हे उघडकीस आणले बावत...**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चैन-चोरीच्या घटना घडत असल्याने मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी चैन-चोरीच्या घटनांचा आढावा घेवूंन गुन्हे शाखेकडील आधिकारी व अंमलदार यांना चैन-चोरीचे गुन्हयास प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेश दिले. त्या प्रमाणे व.पो.नि. श्रीराम पौळ यांनी योजना आखुन खंडणी विरोधी पथकाचे तीन टिम व चिंचवड पो.स्टे. कडील एक टिम तयार केल्या. चेन स्नॅचिंग घटनेच्या ठिकाणांचा आढावा घेवून आकुर्डी, निगडी, चिंचवड, पिंपरी या परिसरातील सुमारे १७० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये चेन चोरी करणा-या इसमांचा येण्या-जाण्याच्या मार्गाचा आढावा घेवुन सलग ०३ दिवस रात्र सापळा लावण्यात आला. त्या दरम्यान पोलीस नाईक आशिष बोटके व स्वप्निल शेलार यांना मिळालेल्या खात्रीशीर बातमी वरुन इसम नामे १) प्रभाकर येमनप्पा दोडमणी वय २६ वर्षे रा. आनंदनगर झोपडपट्टी चिंचवड पुणे २) अल्ताफ सलीम शेख वय १९ वर्षे रा. हांडेवाडी, हडपसर, पुणे यांना चिंचवड येथे मो. सायकलसह ताब्यात घेवुन विचारपुस करता, त्यांनी चिंचवड येथील दुध डेअरी मधील महिलेच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र चोरी केल्याची कबुली दिल्याने, त्यांना चिंचवड पोलीस ठाणे गु.रनं. २८७/२०२० भादवि कलम ३९२, ३४ मध्ये दि. २०/१२/२०२० रोजी १७:४० वा. अटक करुन त्यांची पोलीस कोठडीची रिमांड घेण्यात आली.

पोलीस तपासामध्ये वरील दोन्ही आरोपी हे चोरलेल्या वाहनाचा महीलांच्या गळ्यातील चैन-स्नेचिंग गुन्ह्या करीता वापर करीत होते. त्यांचेकडून चैन चोरी गुन्हयातील २०० ग्रॅम सोन्याचे दागिने किंमती १०,०००,००/-रु. व २,६०,०००/-रु. किंमतीचे ५ दुचाकी वाहने असा एकुण १२,६०,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, त्यांचेकडुन चेन चोरीचे १५ व वाहन चोरीचे ०५ असे एकुण २० गुन्हे उघडकीस आणले आहेत. दोन्ही आरोपीकडुन चैन चोरीचे पिंपरी पो.स्टे. ०२ गुन्हे, चिंचवड पो.स्टे ०५ गुन्हे, निगडी पो.स्टे ०४ गुन्हे, वाकड, सांगवी, हिंजवडी, चिखली पो.स्टे कडील प्रत्येकी एक गुन्हा तसेच मोटार सायकल चोरीचे पिंपरी पो.स्टे. ०३ गुन्हे व भोसरी पो.स्टे. ०२ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

**आरोपी प्रभाकर येमनप्पा दोडमणी हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द, पुणे शहर, पुणे रेल्वे, हुबळी, गदग. कर्नाटक येथे जबरी चोरी, वाहन चोरी असे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड पो. आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा.पो. आयुक्त श्री आर.आर.पाटील, व श्रीमती प्रेरणा कट्टे, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे व. पो. नि. श्रीराम पौळ, पीएसआय महेंद्र पाटील व शाकीर जिनेडी पो. अंमलदार अशोक दुधवणे, गणेश हजारे, निशांत काळे, सुनिल कानगुडे, किरण काटकर, आशिष बोटके, संदीप पाटील, शैलेश मगर, सुधिर डोळस, प्रदीप गुट्टे, शकुर तांबोळी, आशोक गारगोटे तसेच चिंचवड पो.स्टे.चे पो.नि. विश्वजीत खुळे, सपोनि अभिजीत जाधव, पो. अंमलदार स्वप्नील शेलार, गोविंद डोके, विजयकुमार आखाडे, यांचे पथकाने केली आहे.

**(श्रीराम पौळ)**
व.पो. निरीक्षक, खंडणी विरोधी पथक,
गुन्हे शाखा,पिंपरी चिंचवड

